# मुकूल माधव फाऊंडेशनच्या साथीने विश्वासचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण



■ पुणे :

उच्च शिक्षण घेऊन कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बदलण्याचे, आयुष्यात यशस्वी होणे हे विद्यार्थीदशेत असणाऱ्या प्रत्येकाचे महत्वाचे स्वप्न असते. दहावीची परीक्षा देऊन, आयुष्याच्या नव्या टप्प्याला सामोरे जाण्याचे स्वप्न बघणारा विश्वास शिंदे हा असाच एक हुशार विद्यार्थी. दुर्दैवाने नववीत असताना विश्वासला मम्प्स अटॅकचा सामना करावा लागला, ज्यामुळे त्याला कायमचे बहिरेपण आले. बेताची आर्थिक परिस्थिती आणि कायमच्या बहिरेपणाचे अनपेक्षित संकट, या सत्याचा धीराने सामना करत विश्वासने दहावीची परीक्षा ८०% गुण मिळवून उत्तीर्ण केली आणि रत्नागिरी येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मेकॅनिकल इंजिनियरिंग डिप्लोमा अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. शारीरिक अडचणींचा सामना करतच उच्च शिक्षणाचा प्रवास सुरु केलेल्या विश्वासच्या स्वप्नांवर मुकूल माधव फाऊंडेशनने विश्वास ठेवला. फक्त शारीरिक अडचणीवर मात करण्यापुरते नाही तर उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यातही मुकूल माधव फाऊंडेशनने विश्वासला साथ दिली.

रत्नागिरी येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश घेतल्यानंतर विश्वासची समस्या प्राध्यापक श्री. बेळवालकर यांच्या लक्षात आली. मात्र यासंबंधित अधिक तपासण्या करण्यास सांगितल्यावर त्याला कॉक्लिअर इम्प्लांट उपचार आवश्यक असल्याचे निदान करण्यात आले. डॉ. एम.व्ही. हिंदुजा हॉस्पिटल, मुंबई येथील डॉ. किर्तने यांनी विश्वासाची तपासणी करून कॉक्लिअर प्रत्यारोपण करण्यापूर्वी काही चाचण्या करण्यास विश्वासला सांगितले. यावेळी डॉ. क्षमा कोवाळे यांनीही विश्वासला मदत केली. शस्त्रक्रियेतील महत्वाची अडचण होती ती कॉक्लिअर यंत्र बसविण्यासाठी येणारा खर्च. यासाठी डॉ. किर्तने यांनी मुकूल माधव फाऊंडेशनं मदतीसाठी बोलावले. मुकूल माधव फाऊंडेशनने नेहमीप्रमाणे कोणताही विलंब न लावता ५.५ लाख रुपयांची देणगी दिली. त्यामुळे विश्वास शिंदे यांची श्रवणशक्ती पूर्ववत करण्यास मदत झाली. मुकूल माधव फाऊंडेशन एक पाऊल पुढे जात त्याला मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये बी. ई. करण्यासाठी तीन वर्षे दरवर्षी वीस हजार रुपये देऊन त्याच्या शिक्षणालाही प्रोत्साहन दिले. विश्वासनेही हे प्रोत्साहन सार्थ करत फिनोलेक्स अ‍ॅकेडमी ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी (एफएएमटी) मधील अभियांत्रिकी परीक्षा प्रथम श्रेणीने उत्तीर्ण केली.

मुकूल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती रितु छाब्रिया म्हणाल्या, आर्थिक विकासासाठी शिक्षण हा एक कळीचा मुद्दा असून फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि एमएमएफमध्ये आम्ही सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देतो. विश्वासचा आम्हाला अभिमान आहे. स्वतःच्या मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर विश्वासने सर्व कठीण आव्हानांवर स्वप्न साकार केले आहे. एमएमएफने नेहमीच समाजातील खऱ्या वेदनांचे मुद्दे ओळखून ते बरे करण्यासाठी कार्य केले आहे. आरोग्य, शिक्षण आणि वंचितांच्या सशक्तीकरणाच्या कार्यावर केंद्रित असलेल्या एमएमएफने भविष्यात या प्रयत्नांचा विस्तार करून ते बळकट करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

विश्वास शिंदे म्हणाला, मला नवे जीवन मिळवून दिल्याबद्दल फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापनाचे मी आभार मानू इच्छितो. मुकुल माधव फाऊंडेशनबद्दल बोलण्यासाठी माझ्याकडे शब्द कमी पडतात. त्यांनी मला केवळ शस्त्रक्रियेसाठीच मदत केली नाही, शिक्षण पूर्ण करण्याचे माझे स्वप्न साकारण्यासाठीही आधार दिला. माझे पालक, शिक्षक आणि पुढे येऊन शक्य ते सर्व करणाऱ्या डॉक्टरांचाही मी आभारी आहे.